International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

Original Article

शिवराजाभिषेक: भूमीपुत्राची सार्वभौमत्वासाठीची राज्यक्रांती

प्रा. डॉ. रामचंद्र गुरुलिंग घुले

मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

Manuscript ID: IJAAR-140132

ISSN: 2347-7075
Impact Factor – 8.26

Volume – 14
Issue – 1
September- October 2026
Pp. 252 - 266

Submitted: 03 Oct 2026
Revised: 14 Oct 2026
Accepted: 20 Oct 2026
Published: 25 Oct 2026

Corresponding Author:
प्रा. डॉ. रामचंद्र गुरुलिंग घुले

Quick Response Code:

Website: https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.23658230

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.23658230

Creative Commons

OPEN ACCESS

सारांश (Abstract):

प्रस्तुत शोध निबंधात १७ व्या शतकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा राजाभिषेक[१] सोहळा (६ जून १६७४) ही केवळ एक धार्मिक वा राजकीय घटना नसून, ती एतद्देशीय भूमीपुत्रांच्या सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि राजकीय सार्वभौमत्वासाठी घडून आलेली एक क्रांती होती, या सिद्धांताची मांडणी इतिहास संशोधन पद्धतीशास्त्र व माफुआ पद्धतीशास्त्राच्या आधारे करण्यात आली आहे. शिवराजाभिषेक ही केवळ राजकीय सत्ता बदलाची घटना नव्हती, तर ती शतकानुशतके दडपलेल्या भूमीपुत्रांना आत्मभान, स्वाभिमान आणि मानवी हक्क मिळवून देणारी सामाजिक व राजकीय क्रांती होती. शिवरायांनी राजाभिषेकाद्वारे रयतेच्या मनात 'आपले राज्य' ही भावना दृढ केली होती. शिवराजाभिषेकाने आधुनिक लोकशाही, सर्वधर्मसमभाव, स्त्री-सन्मान, शेतकरीहित आणि कायद्याचे राज्य या मूल्यांची मुहूर्तमेढ रोवली. म्हणून शिवराजाभिषेक दिन हा केवळ इतिहास नसून तो भारतीय लोकशाहीचा आणि बहुजन मुक्तीचा लोकोत्सव आहे.

नमुना शब्द (Keywords): शिवराजाभिषेक, सार्वभौमत्व, भूमीपुत्र, वतनदारी निर्मूलन, शाक्त राजाभिषेक, राज्यव्यवहार कोश.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)

This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0), *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

How to cite this article:

प्रा. डॉ. रामचंद्र गुरुलिंग घुले (2026). शिवराजाभिषेक: भूमीपुत्राची सार्वभौमत्वासाठीची राज्यक्रांती. International Journal of Advance and Applied Research, 14(1), 252 – 266. https://doi.org/10.5281/zenodo.23658230

प्रस्तावना:

स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही लोकशाहीची मूलभूत तत्वे राजेशाहीमध्ये अंमलात आणून धर्मनिरपेक्ष स्वराज्य निर्माण करणारे रयतेचे राजे, सर्वसामान्य रयतेसाठी आपले जीवन समर्पित करणारे युगपुरूष, कुळवाडीभूषण, सर्वजनप्रतिपालक, स्वराज्य-संस्थापक, शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांनी १७ व्या शतकात स्वराज्य स्थापना व राजाभिषेक करून महान

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

अलौकिक कार्य केले. स्वराज्य, सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा शिवराजाभिषेक दिन आज रयतेचा उत्सव बनला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजाभिषेक ही ऐतिहासिक दृष्टीने महत्वाची घटना मानली जाते. **ज्येष्ठ शुध्द त्रयोदशी शालिवाहन शके १५९६ (शनिवार) म्हणजेच ६ जून १६७४** ला स्वतःस रायगडावर राजाभिषेक करून घेतला आणि एका हिंदवी स्वराज्याच्या रूपाने एक नवे सार्वभौम राज्य स्थापित झाले. शिवराय छत्रपती शिवाजी महाराज झाले. ही गोष्ट काही सामान्य नव्हती. त्याकाळात हिंदूस्थानभर परकीयांचे यवनांचेच राज्य होते. मोगल बादशहा औरंगजेबाचे तर महाप्रचंड साम्राज्य! अखिल हिंदुस्थान तो स्वत:च्या कब्जात आणू पाहात होता. समुद्र किनारी डच, पोर्तुगीज, इंग्रज, सिद्दी यांचे वर्चस्व होते. दक्षिण हिंदूस्थानात आदिलशहा आणि कुतुबशहा यांची सत्ता होती. हे सगळे स्वराज्याचे शत्रू शिवाय परकीय सत्ताधीश होते. हिंदवी स्वराज्य म्हणजे एका स्वतंत्र व सार्वभौम राज्याची स्थापना होती. नवी घटना (कानू जाबता), नवी राजभाषा, नवीन नाणी, नवे दंडक नवा राजकोष, नवा राजशक म्हणजे शिवरायांनी स्वबळावर एक नवे युगच निर्माण केले होते. शिवरायांचा राजाभिषेक म्हणजे परकीय शत्रूंना खूप मोठा आणि जबरदस्त दणका होता. अर्थात, त्या सगळ्या शत्रूंमध्ये राजाभिषेकाचे सर्वात जास्त दु:ख औरंगजेबालाच झाले होते.

स्वराज्याची शपथ ते राजाभिषेक हा शिवरायांचा प्रवास मोठा खडतर व रोमांचकारी संघर्षाने भरलेला आहे. मध्ययुगात एतद्येशीयांनी राजाभिषेक करणे, राजा होणे, राज्य करणे हे कल्पनेच्या पलीकडे होते. कोणत्यातरी शाहीच्या हाताखाली चाकरी करणे, वतन मिळविणे, जहागिरी सांभाळणे, मनसबीत धन्यता मानणे या वर्तुळापलीकडे कोणाची झेप नव्हती. अनेक पराक्रमी सरदार हे मोगल, निजाम, आदिलशहा यांच्या सेवेतच समाधान मानत होते. आपला जन्म केवळ दुसऱ्याची चाकरी करण्यासाठी झाला आहे, असा दृढ समज भारतीयांमध्ये झालेला होता. पराक्रम गाजवायचा, रक्त सांडायचे पण ते दुसऱ्याच्या सत्तेसाठी, अशा गुलामीचे जीवन एतद्देशीय जगत होते, या गुलामीला तिलांजली देण्याचे ऐतिहासिक कार्य छत्रपती शिवाजीराजांनी केले.

संशोधन पद्धतीशास्त्र:

ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करताना प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला आहे. तसेच गुणात्मक सांशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

संशोधनाची समस्या:

मध्ययुगीन काळात सरंजामी व परकीय सत्तांच्या शोषणाखाली दबलेल्या भूमिपुत्रांना सार्वभौमत्वाचा आणि सामाजिक समतेचा अधिकार शिवराजाभिषेकाद्वारे कसा प्राप्त झाला? तसेच राजाभिषेकास झालेला सनातनी विरोध आणि त्यातून निर्माण झालेली राजकीय-सामाजिक क्रांती याचा इतिहासमीमांसेच्या दृष्टीने अभ्यास करणे ही प्रस्तुत संशोधनाची मुख्य समस्या आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. शिवराजाभिषेक ही केवळ राजकीय घटना नसून भूमिपुत्रांची सामाजिक व राजकीय क्रांती होती हे सिद्ध करणे.
२. शिवराजाभिषेक हा वतनदारी निर्मूलन, कृषी-सुधारणा व स्त्री-सन्मान व लोककल्याणकारी स्वराज्याचासाठी होता हे सिद्ध करणे.
३. वैदिक व शाक्त (तांत्रिक) दोन्ही राजाभिषेकांचे राजकीय व सामाजिक महत्त्व अधोरेखित करणे.

स्वराज्याचे अधिष्ठान:

मध्ययुगात मुस्लिम राज्यकर्त्यांचे राजाभिषेक साजरे केले जात असताना, 'कलियुगात दोनच वर्ण - ब्राह्मण

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

व शूद्र' हे मनु विधान ऐकवून बहुजनांना शूद्र ठरविले गेले होते. शिवरायांना सुद्धा क्षत्रियत्वाच्या मेरीटच्या कसोटीवर बाद ठरवून, शूद्र म्हणून हिणवलं गेले व राजाभिषेकासाठी अपात्र ठरविण्यात आले होते. बहामनी सुलतान व मुगल बादशहांची हुजरेगारी आणि चाकरी करणाऱ्या सरदार जहागिरदारांना कोणीही क्षत्रियत्वाचं मेरीट विचारलं जात नसे. पण प्रवाहाविरुद्ध पोहून, जीवनसर्वस्व पणाला लावून, पहिल्या हिंदवी स्वराज्याची उभारणी करणाऱ्या शिवरायांबाबत मात्र, नेमका मेरीटचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. शिवराजाभिषेक ही दबलेल्या, नाउमेद झालेल्या, पिचलेल्या, हताश झालेल्या एतद्देशीयांना नवचैतन्य देणारी घटना ठरली होती.

कृष्णाजी अनंत सभासद म्हणतो, "या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. हा मराठा पातशः एवढा छत्रपती झाला, ही गोष्ट काही सामान्य झाली नाही." शिवाजीराजांनी राजाभिषेक करून शेकडो वर्षांची गुलामगिरी नष्ट केली. भूमिपुत्रांचे मांडलिकत्व नष्ट झाले. आजही राजाभिषेक हा केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर संपूर्ण भारतीयांसाठी स्फूर्तिदायी घटना आहे. शिवरायांची प्रेरणा घेऊन छत्रसाल राजाने स्वतंत्र राज्य निर्माण केले. राजाभिषेक ही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, भाषिक स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ होती. स्वराज्य हे स्वातंत्र्यासाठी लढणारे जे भूमीपुत्र होते अशा सगळ्या भूमीपुत्रांचे हे राज्य होते.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते, "महाराजांच्या उदयापूर्वी मराठी संतांनी समाजात आध्यात्मिक समता प्रस्थापित केली होती. त्या सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाच्या पार्श्वभूमीवर महाराजांनी सर्वसामान्य लोकांची राजकीय आकांक्षा आणि अस्मिता जागृत केली." शिवरायांनी स्थापन केलेलं राज्य मराठ्यांच्या किंवा हिंदूंच्या पुरतं मर्यादित नव्हतं. ते सर्व जाती धर्मीयांचा होतं. शिवरायांचे स्वराज्य नैतिक मानदंड व आदर्शाच्या मूल्यांवर आधारित होते. शिवरायांच्या स्वराज्याला सामान्य, शेतकरी व हलक्या जातीच्या गोरगरीब मावळ्यांनी मदत केली. त्यांना शिवरायांनी मोठे केले. सरदार दरकदार बनविले. वतनदारांना वेतनदार बनविले. त्यांची मुखत्यारी रद्द केले. मोठी सामाजिक क्रांती केली. शिवरायांचा लढा हा वतनदार व जाहगीरदारांनी चालवलेल्या शोषणाविरुद्धचा लढा होता. या लढ्यासाठी शिवरायांनी शेतकरी, कष्टकरी, बलुतेदार व अलुतेदारांना एकत्र करून क्रांतिकारी लढा उभा केला. शिवरायांचा लढा हा धर्मसत्ता आणि तिच्या आश्रयाने बळकट झालेल्या राजसत्तेच्या पिळवणुकी विरुद्ध होता. भरले खळे जमीनदाराने लुटले तर तक्रार कुणाजवळ करायची? जनतेचे वित्त व अब्रू सुरक्षित नव्हती. देखण्या मुली राजरोस पळवत असत. स्त्रियांच्या अब्रूवर धाड घालत असत. शिवरायांनी रांझेगावच्या पाटलाला धडा शिकवून स्त्रियांची अब्रू सुरक्षित राहील याची ग्वाही दिली. वतनदारांचे करवसुलीचे व न्यायनिवाड्याचे त्यांचे हक्क काढून घेतले. याविरुद्ध गडबड करणाऱ्यांचे हात-पाय तोडले. मध्ययुगात स्त्री ही स्वाभिमानाची, कुटुंबांच्या अब्रूची खूण समजली जाई. आपल्या राज्यात स्त्रीची अब्रू बिनधोक करून शिवाजीने प्रजेला पोटभर अन्न दिले. स्वाभिमानाला संरक्षण दिले. स्त्रीची अब्रू सांभाळण्यासाठी त्यांनी निष्ठावान विजयी सेनापती सखोजी गायकवाड याचेही डोळे काढण्यास कमी केले नाही. हा निर्णय महाराजांच्या कठोर धोरणाचे आणि न्यायनिष्ठेचे उदाहरण आहे. म्हणून **नरहर कुरुंदकर** लिहितात, *"शिवाजीच्या राज्याचे रहस्य समजून घ्यायचे असेल तर त्यासाठी अफझलखान वध समजून घेऊन उपयोग नाही. शिवाजीने जिद्दीने घडवून आणलेला हा वतनदारीचा वध सर्वांत महत्त्वाचा आहे."* **सभासद** सांगतो, 'येताच बारा मावळे काबीज केली, मावळे, देशमुख बांधून, दस्त करून पुंड होते त्यास मारले. बहुत सावधपणे चौकशीने वर्तणूक करीत राहिले.'

छत्रपती शिवरायांनी आपला राजाभिषेक वैदिक पद्धतीने करण्याचा आग्रह म्हणजे त्यांची राजकीय, सामाजिक व धार्मिक क्रांती होती. फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

नेपोलियन बोनापार्ट असेल तर वारकरी संप्रदायाचे अपत्य छत्रपती शिवाजी महाराज म्हटले पाहिजे. महत्वाचे म्हणजे शिवरायांच्या राजमुद्रेत कोठेही या राज्यावर ईश्वराचे अधिष्ठान आहे किंवा ईश्वराचे वरदान आहे असे म्हटलेले नाही. शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. 'हिंदवी'चा अर्थ धर्मवाचक व मुस्लिम विरोधी नसून तो एत्तदेशीय स्वराज्य दर्शवितो. शिवाजी राजांचे नाव शिवाई देवीवरून ठेवले होते. **प्रा. अशोक राणा** म्हणतात, शिवाई देवी बौद्ध भूमाता 'तारा' आहे. **डी डी कोसंबी** यांच्या मते, भगवा ध्वज वारकऱ्यांनी बौद्ध प्रभावातून स्वीकारला होता. शिवरायांचे आजोबा मालोजीराजे हे चांभारगोंदे (श्रीगोंदे) येथील सुफी संत शेख महंमदांचे भक्त होते. सर्वधर्मसमभावाचा हा वारसा शिवरायांच्याकडे पिढी जात होता, हे लक्षात घ्यावे लागेल. **कवी परमानंदाने** 'शिवभारत' या ग्रंथात शिवरायांना विष्णूचा एकविसावा अवतार मानले. वैदिक व्यवस्थेने शिवरायांना आपल्या दैवत पंचायतनात सामावून घेतले. छत्रपती शिवाजी राजे धार्मिक होते पण धर्म भोळे नव्हते. कठोर होते पण क्रूर नव्हते. उच्च ध्येय बाळगणारे स्वातंत्र्य अभिमानी होते. समर्थ रामदास स्वामींनी महाराजांचे अत्यंत समर्पक वर्णन महाराजांना कवितेच्या रूपात लिहिलेल्या पत्रात केले आहे.

निश्चयाचा महामेरू। बहुत जनासी आधारू।
अखंडस्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।
या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही।
महाराष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हांकरिता।।

बहुत जनांसी म्हणजे अनेक जाती धर्मियांना आधार देणारे, सर्वधर्मसमभाव बाळगणाऱ्या महाराष्ट्र धर्माचे रक्षण करणारे असा गौरव शिवरायांचा समर्थांनी केला आहे. शिवरायांनी न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता व सर्वधर्मसमभावावर स्वराज्याची बांधणी केली होती. शूद्रांच्या हाती शस्त्रे देऊन त्यांना क्षत्रिय बनविले.

राजाभिषेकाची कारणे व उद्देश:

१. स्वतंत्र सार्वभौम राजशक्तीची निर्मिती करणे.
२. मुस्लिम राज्यकर्ते शिवाजीयांना राजा मानावयास तयार नव्हते. बरोबरीच्या नात्याने करार करण्यास तयार नव्हते.
३. पूर्वीच्या इनाम दानपत्रांना मान्यता देण्यात अडचणी येत असत.
४. घटनात्मक व कायदेशीर अडचणी निर्माण होत असत.
५. चौथाई सरदेशमुखीच्या वसुलीत अडचणी येत असत.
६. कर, न्यायदान, शिक्षा, तह इत्यादींना धार्मिक अधिष्ठान प्राप्त करणे गरजेचे होते.
७. घटनात्मक मुलकी व लष्करी शासन प्रणाली निर्माण करण्यासाठी राजाभिषेक करणे आवश्यक होते.
८. ब्राह्मण गुन्हेगारांना शासन करता येत नव्हते. न्यायदान करण्यात येणारे अडचण येत असे.
९. पुरंदरचा तह व आग्रा भेट यावेळी शिवाजी राजांना दुय्यम वागणूक मिळाली होती.
१०. खरेखुरे राजे पद नसल्याने स्वामीनिष्ठ कोणाशी ठेवावे असा प्रश्न सरदार मंडळींना पडून ते फितूर होत असत. सरंजामदारांना व जनतेला निष्ठा कोणाशी ठेवायची हा घटनात्मक पेच प्रसंग जाणवत होता.
११. प्रजा, रयत, सरंजामदार व सैनिकांना आपला खरा वाली कोण? आदिलशहा की शिवाजी राजे? असा प्रश्न पडत असे.
१२. इथल्या भूमिपुत्रांना व मराठी लोकांना परकीय राजवटीत दुय्यम स्थान व नागरिकत्व होते.
१३. राजाला धर्माचे अधिष्ठान नसल्याने नवे कर व आर्थिक बदल घडवून आणता येत नव्हते.
१४. मनुस्मृतीनुसार अभिशिक्त राजालाच धार्मिक सुधारणा करून न्याय देता येत असे.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

१५. शिवपूर्व काळापासून चांद्रसेनीय कायस्थ प्रभू व ब्राह्मण यांच्यात मोठा संघर्ष होता. राजाभिषेकापाठीमागे अनेक कारणांपैकी एक कारण आहे ते म्हणजे शिवरायांचे प्रशासन राजगडाकडून रायगडाकडे गेल्यानंतर कार्यक्षम प्रशासनासाठी मोठ्या प्रमाणात हुशार व स्वामिनिष्ठ कायस्थांना मोठ्या प्रमाणात शिवरायांनी जागा दिल्या होत्या. त्यातून कायस्थ व ब्राह्मणवाद पेटू लागला होता.

१६. सततची भांडणे, ब्राह्मण व सरंजामदार गुन्हेगारांना शासन करणे, येणाऱ्या अडचणींच्यावर कायमचा उपाय म्हणजे आपले क्षत्रिय सिद्ध करून राजाभिषेक करणे हे शिवरायांना महत्त्वाचे वाटले होते.

१७. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व राजमाता जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्याची निर्मिती करणे.

१८. शिवाजी राजे जातीच्या दृष्टीने खालच्या पातीचे आहेत, अशी अढी तत्कालीन मराठा सरदारांच्यामध्ये होती. भोसल्या हे हलके समजत असत. त्यांच्या क्षत्रियत्वाला त्यांनी विरोध केला तेव्हा, स्वराज्य निर्मिती करायची असेल तर राजाभिषेकाशिवाय पर्याय नाही हे शिवरायांनी ओळखले होते.

१९. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी व त्यांच्यावरील अन्याय निवारण्याकरिता त्यांना दाद मागण्यासाठी, सर्वोच्च सत्ताकेंद्र निर्माण करणे व त्याची राजाभिषेकाद्वारे अधिकृत घोषणा करणे, कायदा व सुव्यवस्थेसाठी अत्यावश्यक होते. सर्वसामान्य जनता राजाच्या ठिकाणी परमेश्वराचे रूप पाहत असल्यामुळे जनतेचा पाठिंबाही याद्वारे मिळवण्यासाठी राजाभिषेक आवश्यक होता.

२०. करवसुली करताना येणारे अडथळे दूर करून संपूर्ण राज्यात एकाच पद्धतीची करवसुली, नियमावली पद्धती निर्माण करणे. देशमुख, कुलकर्णी, पटवारी इत्यादीच्या मनमानी कारभारास प्रतिबंध करणे.

इतिहासाचार्य वा. सी. बेंद्रे यांच्यानुसार, "छत्रसिंहासनाच्या धर्मसिद्ध प्रतिष्ठेने हिंदवी राज्यसंस्थेला सांस्कृतिक, राजकीय आणि नैतिक अथवा सामाजिक श्रेष्ठ दर्जा व स्थैर्य प्राप्त होण्याचे सामान्य उद्दिष्ट या राजाभिषेकामागे होते." अभिषिक्त राजा म्हणून प्रतिष्ठा नसल्याने शिवाजीराजांना सामाजिक व धार्मिक बाबतीत सत्ता नव्हती. हा रुढीचा दंडक राजकारभारात आडवा येऊ लागला. प्रजेलाही हा जाच जाणवत होता. इतर जातीयांना कडक शासन तात्काळ मिळत असे. परंतु ब्राह्मणांना दूर करण्यापलीकडे त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार शिवाजीराजांना नव्हता. सारांश, छत्रसिंहासनाची प्राणप्रतिष्ठा करुन साधिकार राजपद मिळविण्याखेरीज श्रेष्ठ यातींतील गुन्हेगारांना शासन करण्याचा अन्य उपाय राहिला नव्हता. यामुळेच त्यांनी स्वतःचा राजाभिषेक केला. **आनंद घोरपडे** यांच्या मते "कलियुगात ब्राह्मण व शूद्र असे दोन वर्ण राहतात व अशाच स्वरूपाच्या इतर भोंगळ व आपमतलबी सिद्धांतांचा देशाच्या राजकारणावर व समाजकारणावर अनिष्ट परिणाम झाला होता. बहुजनांवर त्यामुळे मानसिक दास्याचा पगडा बसला. घर्मेंडखोर, अन्यायी धर्मसत्तेपेक्षा मुसलमानी राजवट परवडली अशी समाजाची भावना झाली.[२] अशा परिस्थितीत स्वतःला राजाभिषेक करून घेऊन क्षत्रिय नात्याने राज्य करण्याचा हक्क प्रस्थापित करणे शिवाजीराजांना आवश्यक वाटले.

मध्ययुगीन काळात राज्यकारभार करणे, पत्रव्यवहार, तह, करार, न्यायदान, चलन व्यवस्था, कृषि कायदे, करप्रणाली, संरक्षण, दळणवळण इत्यादीसाठी राजाभिषेक अत्यावश्यक होता. जोपर्यंत राजाभिषेक नव्हता, तोपर्यंत शिवरायांना सरदाराचा पुत्र, जमीनदार, वतनदार असेच समजले जात असे. भारतात अनेक सरदार, वतनदार होते. त्यापैकी अनेक शूर, पराक्रमी, उत्तम प्रशासक होते. तरीदेखील ते कोणत्यातरी केंद्रीय सत्तेचे मांडलिक

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

होते. त्यांना सर्वाधिकार नव्हते, त्यामुळे त्यांची प्रजा आणि ते स्वतंत्र नव्हते. अनेक मराठी सरदार मोगली अथवा आदिलशाही नोकर असूनही स्वतःस राजा मानत. खुद्द शिवरायांचे व्याही व इतर नातलगी त्यांना राजा मानायला तयार नव्हते. त्यांना अंकित करून त्यांच्यावर वचक बसविण्यासाठी शिवरायांना राजाभिषेक गरजेचा वाटला. **रियासतकर सरदेसाई** आपल्या मराठी रियासत या ग्रंथात लिहितात, "शिवाजीची मोठी अडचण विजापूरकरांच्या ताब्यात असलेली मोठ मोठी मराठे सरदार घराणे होती. त्यांच्या मनात शिवाजी बद्दल आदर किंवा पूज्य बुद्धी नव्हती. मोहिते, घोरपडे, मोरे, सावंत, दळवी, सुर्वे व निंबाळकर इत्यादी सरदार आरंभापासून कमी जास्त प्रमाणात शिवाजी विरुद्ध होते. शिवाजीला घाडगे, खंडागळे, बाजी घोरपडे, बाजी मोहिते, निंबाळकर, मोरे बांदल, सावंत, सुर्वे, खोपडे, पांढरे, कोकणचे देसाई, मावळचे देशमुख वगैरे प्रमुख मराठे हिंदू सरदारांचा विरोध होता. व्यंकोजी भोसले व मुंबाजी भोसले हे अगदी जवळचे भाऊबंद विरोधात होते आईकडून नातेसंबंधी असलेले जगदेवराव जाधव व रथोजी माने हे सुद्धा विरोधात होते.[३] डॉ. आंबेडकरांच्या विश्लेषणावरून शिवाजी राजांना वैदिक राजाभिषेक करण्यापाठीमागे जी कल्पना आहे ती सामाजिक दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी होती ती कायदेशीर किंवा राजकीय अधिसत्ता मिळवण्यासाठी नव्हती.[४]

राजाभिषेकातील अडचणी:

शिवरायांचा मुंज विधी व मंत्रविधीयुक्त लग्न झाले नव्हते. संस्कारक्षय झाला होता, त्यामुळे क्षत्रियत्व राहिले नव्हते, यावर मनुवाद्यांनी शिक्कामोर्तब केले होते. बहुजन मराठ्यांना धार्मिक क्षेत्रात दुय्यम वागणूक होती. राजाभिषेकापूर्वी पुरंदरचा तह व आग्रा भेटीत शिवाजी राजांना दुय्यक वागणूक मिळाली होती. त्यामुळे राजांना अभिषिक्त राजे होणे गरजेचे वाटले असावे. शिवरायांना राजा म्हणून धर्माचे अधिष्ठान प्राप्त झाले नव्हते. शिवरायांना नवे युग, नवे चलन, स्वतंत्र ध्वज, नवशक, नवे राज्य चिन्ह, नवे पद आवश्यक वाटत होते.

राजाभिषेकाच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करताना **वा. सी. बेंद्रे** लिहितात, "ब्राह्मण गुन्हेगारांना शासन करण्याबाबत अडचणी येत असत. ब्रह्मवृंद व काशीच्या ब्राह्मणांना जमवून वाद सोडवावा लागत असे. या संदर्भातील आज्ञा-निवाडे पंडितरावांच्याच नावे काढावे लागत असत इतर जातींच्या वर अन्याय होत असे. ब्राह्मणांच्याच बाजूने न्याय दिला जाई. रघुनाथ पंडित तळमळीने व राजनिष्ठेने न्यायनिवाडा करत परंतु इतर ब्राह्मण पंडित त्यांचा द्वेष करत. अभिषेक्त राजा म्हणून प्रतिष्ठा नसल्याने शिवाजीराजांना सामाजिक व धार्मिक बाबतीत सत्ता नव्हती. हा रुढीचा दंडक राज्यकारभारत आडवा येऊ लागला, अशा परिस्थितीत उभारलेले राज्य वाढत्या तेढीने लयास जाण्याची धास्ती वाटू लागली. प्रजालाही हा जाच जाणवत होता."

अभिषिक्त राजा नसल्याने सामाजिक व धार्मिक सत्ता राजांच्याकडे नव्हती. प्रजेला मनुस्मृतीच्या अन्याय कायद्यांचा जाच जाणवत होता. तसेच राजांना त्यांच्या मृत्यूनंतर राज्य लयास जाण्याची भीती वाटत होती. म्हणून राजाभिषेक आवश्यक वाटत होता. पुरंदरच्या तहानुसार व आग्रा भेटीनुसार स्वराज्याचे सार्वभौमत्व धोक्यात आले होते. संभाजी राजांनी मुघलांची पंचहजारी मनसबदारी स्वीकारली होती. आम्ही मोगलांचे मांडलिक नसून स्वतंत्र सार्वभौम राजे आहोत हे सिद्ध करण्यासाठी राजाभिषेक करणे शिवरायांना गरजेचे वाटत असावे. मुस्लिम राज्यकर्ते शिवरायांना राजा मानावयास तयार नव्हते. बरोबरीच्या नात्याने करार करण्यास तयार नव्हते. कायदेशीर अडचणीचे निवारण करण्यासाठी म्हणजे पूर्वीच्या इनाम दानपत्रांना मान्यता देण्यात अडचणी येत असत. चौथाई सरदेशमुखी वसूल करण्यात अडचणी येत असत. आपण जहागीरदार नसून स्वतंत्र राजे आहोत हे दाखविण्यासाठी राजाभिषेक गरजेचा होता. राजाभिषेका द्वारेच करप्रणाली, न्यायदान,

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

व्यवस्था, शिक्षा, तह इत्यादी धार्मिक अधिष्ठानावर प्राप्त होणार होते, घटनात्मक शासन प्रणाली निर्माण होणार होती.

क्षत्रियत्वाचा प्रश्न आणि राजाभिषेकास विरोध:

एखाद्या हिंदूचा सामाजिक दर्जा ठरविण्याचा कायदेशीर अधिकार ब्राह्मण वर्णाचा होता. ब्राह्मणी विशेष अधिकारावर गदा येणार असल्याने राजाभिषेक करण्यास महाराष्ट्रातील ब्राह्मण मंडळी तयार होत नव्हती. राजा ब्राह्मणास शिक्षाच करू शकत नाही, असे मनुस्मृति सांगते. ब्राह्मण दुर्जनी असले तरी तो पूजनीय असतो आणि शूद्र शक्तिशाली असला तरी अपुज्य ठरतो असे एका संस्कृत श्लोकात म्हटले आहे.

दु: शीलोऽपि द्विज: पूज्यो नच शूद्रो जितेंद्रय |

राजा हा देवाचा अंश असतो. शुद्रात देवाचा अंश नसतो म्हणून शूद्राला राजा होता येत नाही. ब्राह्मण वर्णातच ईश्वराचा अंश असतो. ज्यांच्यात ईश्वराचा अंश आहे त्यांनाच राजा होता येते. अशी तत्कालीन धारणा होती. तसा धर्म व्यवस्थेचा आग्रह होता. परंतु मुसलमान राजा होऊ शकतो अशी तत्कालीन सनातन्यांची मिलीभगत धारणा होती.

देवाधिन जगत सर्वम् मंत्राधीनंच दैवतम |
ते मंत्रा: ब्राह्मणाधीना ब्राह्मणोमम दैवतम् ||

अर्थात देवाच्या स्वाधीन सर्व जग आहे व देव मंत्रांच्या आधीन असल्यामुळे ब्राह्मणच माझे दैवत आहेत असे खुद्द परमेश्वर म्हणतो, असे सनातन्यांनी लिहून ठेवले होते.[५] बाळाजी आवजी चिटणीस यांनी शिवाजी राजांना राजे क्षत्रिय आहेत हे सिद्ध करण्यासाठी आपले तीन ब्राह्मण पंडित केशव भट, भालचंद्र भट व सोमनाथ भट यांना गागाभट्टाकडे पाठवले परंतु गागाभट्टाने शिवाजी राजे शूद्र आहेत, त्यांना राजाभिषेक करता येणार नाही अशा आशयाचे पत्र दिले. त्यानंतर बाळाजी चिटणीसने सिसोदिया मेवाड घराण्यातून शिवाजी राजे सिसोदिया रजपूत क्षत्रिय असल्याची वंशावळ आणली व ती कायस्थ निळू येसाजी या दुताकडे दिली. त्या दुताने ती वंशावळ पटवून दिल्यानंतर गागाभट्ट राजाभिषेकास तयार झाला. गागाभट्ट महाराष्ट्रात आला तेव्हा त्याने इतरांचे एकूण आपले म्हणणे बदलले. शिवाजी राजे शूद्र आहेत तेव्हा बाळाजी आवजीचा राजाभिषेक करू अशी भूमिका घेतली.[६] रेणुका महात्म्यानुसार कार्तवीर्याने जमदग्नीवर 21 वेळा वार करून गाई पळविल्या (कामधेनू) म्हणून परशुरामाने पृथ्वी 21 वेळा नि:क्षत्रिय केली.नि:क्षत्रियत्वाची आणखी एक सनातनी थेअरी होती, **नंदांतम् क्षत्रिय कुलम् I** नंदांच्या अंतराबरोबर क्षत्रिय कुलाचा अंत झाला, अशी प्राचीन काळापासून धारण होती. तसेच अकबराच्या काळात **कृष्ण भट शेष याने 'शुद्राचार शिरोमणी'** नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय करून टाकली असे म्हटले आहे. यावर याकाळात शिक्कामोर्तब करून टाकले होते. या ग्रंथात आता हिंदू धर्मात राज तेजाचे व राजवंशाचे क्षत्रिय कोणीच उरले नाही असे प्रतिपादन केले होते.[७] परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केली, ही केवळ कल्पना आहे.

आपस्तंब धर्मसूत्रात **उपनयन विधीची** माहिती आहे. उपनयनामुळे वेद शिकण्याचा अधिकार पोहोचत होता. उपनयन विधी करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण वर्णापुरता राहिला होता. खरे तर छत्रपती शिवाजी राजांचा उपनयन विधी झाला नव्हता म्हणून त्यांना राजा होता येत नव्हते असा समज तत्कालीन काळात होता. हा विधी ब्राह्मण सोडून सर्व वर्णांना नाकारला गेला. इस 556 पासून उपनयन संस्कार नाकारल्याची उदाहरणे मिळतात.[८]

राजाभिषेक उपनयनविधी शिवाय होऊच शकत नाही. उपनयन करण्याचे शिवरायांचे वय निघून गेले होते. शास्त्राप्रमाणे अकराव्या वर्षी क्षत्रियांचा उपनयन विधी असतो. हा विधी करण्याचे त्यांचे वय लिहून गेले होते. या पुराव्यावरून त्यांना शुद्र ठरविण्यात आले होते. राजाभिषेकावेळी व्रात्यस्तोम विधी करून ही अडचण दूर करण्यात आली.[९] तेव्हा राजमुकुट मुघल बादशहाच्या हातून

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

न घेता गागाभट्टाच्या कडूनच घ्यावा हे बाळाजी आवजीचे म्हणणे होते. जर उपनयन संस्कार झालाच नाही, तर त्याला **'सावित्रीपतीत'** असे म्हटले जाते. उपनयन संस्काराला यज्ञोपवीत, व्रतबंध किंवा मौंजीबंधन संस्कार असेही म्हणत. पूर्वीच्या काळी जर हा संस्कारच झाला नाही, तर विवाहाच्या अगोदर किमान नावाला तरी हा संस्कार करण्याची पद्धत रूढ होती. उपनयन विधी न झालेल्यांना मनुस्मृति व्रात्य म्हणते.[१०] क्षत्रिय शस्त्राने संपविण्यापेक्षा धर्मशास्त्राद्वारे संपवण्यात ब्राह्मण यशस्वी झाले होते. कलियुगात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्त्वात आहेत या मताच्या पुष्टीकरता **व्यासांच्या 'कलावाद्यंतयोः स्थितीः'** म्हणजे कलियुगात प्रारंभीचा व शेवटचा असे दोन वर्ण राहतील. या विधानाचा ते आधार घेत. मत्स्यपुराण, वायुपुराण, नागोजी भट्टलिखित व्रात्यनिर्णय या ग्रंथाच्या आधारे क्षत्रियांचे अस्तित्त्व नाकारून शिवकालीन महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी शिवरायांना शूद्र ठरविले.[११] **गोविंदराव पानसरे** शिवाजी कोण होता? या ग्रंथात लिहितात.[१२] "सनातनी धर्ममार्तंडांचे मत होते की, **नंदातम् क्षत्रिय कुलम्** म्हणजे नंदराजाचा अंत तोच क्षत्रिय कुळांचा अंत होय. तत्कालीन काही मराठा सरदार मंडळी भोसले कुळाला आपल्यापेक्षा दर्जाने कमी समजत. त्यांच्या क्षत्रियत्वाला विरोध करत. स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सहकार्यास नकार देत. तेव्हा राजाभिषेक शिवाय पर्याय नाही हे शिवरायांनी ओळखले. प्रधानांचा विरोध मोडून काढण्यासाठी शिवरायांनी मोठ्या रकमांचा नजराणा त्यांना दिला होता." राजाभिषेकामुळे ब्राह्मण वर्णाचा विशेषत्वाचा दर्जा गुंडाळाला जाणार होता. एखाद्या गुन्ह्यास ब्राह्मण फक्त प्रायचित्त घेत असत. तो दंडक मोडला जाणार होता. ब्राह्मण गुन्हेगाराची चौकशी करण्याचा हक्क राज्य शासनाला प्राप्त होणार होता. राजाभिषेकाने सामाजिक स्थित्यंतर होणार होते. वरील विवेचनावरून शिवरायांना आपले क्षत्रियत्व सिद्ध करण्याकरिता बराच खटाटोप करावा लागला होता हे सिद्ध होते. शिवरायांच्या क्षत्रियत्वावर शिक्कामोर्तब करताना **सभासद** लिहितो, "तेव्हा राजियाचे वंशाचा शोध करिता राजे शुद्ध क्षत्री, शिसोदे, उत्तरेहून दक्षिणेस एक घराणे आले तेच राजियाचे घराणे असे शोधिले."

राजाभिषेक सोहळा:

किंकेडच्या मतानुसार राजाभिषेकासाठी भवानी मातेचा कौल घेण्यात आला होता. राजाभिषेक सोहळ्याची गुप्तता राखण्यात आली. **नारायण शेणवी** हा इंग्रजांचा हस्तक 4 एप्रिल 1674 ला मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला पत्र पाठवून सोहळ्याची माहिती देताना म्हणतो, 'शिवाजीराजे स्वतःला की निजामशाहीच्या वंशाला राजाभिषेक करणार माहित नाही.' इतकी गोपनीयता पाळण्यात आली होती. बाळाजी आवजी चिटणीसने सिसोदिया मेवाड घराण्यातून शिवाजी राजे सिसोदिया रजपूत क्षत्रिय असल्याची वंशावळ आणली. ती गागाभट्टास दिली. गागाभट्ट तयार झाला, परंतु महाराष्ट्रातील ब्रह्मवृंद तयार होत नव्हता. शिवाजी राजांच्या ऐवजी मोरोपंत पिंगळे यांना राजा करण्यास काही ब्रह्मवृंदांनी मान्यता दिली.[१३] तत्कालीन परिस्थितीत गागाभट्टासमोर उभे राहण्याची किंवा धर्मशास्त्रामध्ये त्यांना आव्हान देण्याची किंवा त्यांच्याशी चर्चासुद्धा करण्याची संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाही ब्राह्मणाची पात्रता नव्हती. गागाभट्टाने महाराष्ट्रातील ब्रह्मवृंदावर कठोर टीका केली आणि पैठणच्या धर्मपीठातील ब्राह्मणांना चर्चेला समोर बसण्याचे आव्हान दिले. गागाभट्टाने असे सांगितले की, 'महाराष्ट्रातील ब्राह्मण दिर्घकाळच्या इस्लामिक राजवटीमध्ये आपल्या स्वतःच्याच परंपरा आणि सर्व ज्ञान पूर्णपणे विसरून गेलेले आहेत. उलट मुस्लिम राज्यकर्त्यांना अहोरात्र वंदन करत असून त्यांच्याकडून सर्व प्रकारचे फायदे मिळवण्यात दंग झालेले आहेत, त्यामुळे शिवाजी महाराजांच्या राजाभिषेकाबाबतचा कोणताही निर्णय करू शकेल अशी कोणत्याही ब्राह्मणाची पात्रता नाही'! गागाभट्टाचे हे म्हणणे खरेच होते आणि त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातून कोणताही ब्राह्मण पंडित गागाभट्टाच्या समोर आला नाही.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

शिवरायांचा राजाभिषेक करता यावा याची पूर्वतयारी म्हणून गागाभट्टाने **'श्रीशिवराजाभिषेक प्रयोग'** हा ग्रंथ लिहिला.[१४] स्वराज्याचा राज्यकारभार जनतेला कळावा म्हणून जनतेच्याच भाषेत **'राजव्यवहार कोश'** हा ग्रंथ रघुनाथ पंडितला सांगून धुंडीराज लक्ष्मण व्यास यांच्याकडून करून घेतला. त्याचवेळी पंचांगाच्या सुधारण्यासाठी कृष्ण ज्योतिषी याच्याकडून **'करण कौस्तुभ'** हा नवा करणग्रंथ तयार केला. स्वभाषीय वळणासाठी हा ग्रंथ गरजेचा होता. स्वराज्याला सार्वभौमत्व मिळावे यासाठी शिवरायांनी अनेक मुलकी, लष्करी, धर्माधिकारीणी व न्यायाधीकारीणी कायदे केले. नव्या जुन्या रीती रिवाजात दुरुस्ती केली त्याला पद्धती म्हणतात यासाठी बाळाजी आवजी कडून **'लेखनप्रशस्ती'** ग्रंथ तयार करून घेऊन मुसलमानी लेखन पद्धतीला पायबंद घातला.[१५]

नारायण शेणवी मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला लिहितो, "हिऱ्या सोन्याचे सिंहासन बनविणे सुरू आहे. पण हा राजाभिषेक स्वतः करणार की दुसऱ्या कोणाला माहित नाही." राजपद व राजमुकुट मुघल बादशहा कडून न घेता गागाभट्टा कडून घ्यावा असे बाळाजी आवजीचे म्हणणे होते. शिवरायांनी युद्धाच्या झटापटीत ब्रह्महत्या केल्या होत्या. वैदिक धर्मपरंपरेनुसार ब्रह्म हत्त्येस शुद्धी नाही गागाभट्टाने हा दोष तुला पुरुष दानविधीने नाहीसा केला. त्यासाठी 17 हजार सुवर्ण होन घेतले. राजाभिषेक विधीसाठी एक लक्ष होन रक्कम घेतली.

शिवराजाभिषेकाची सुरुवात शिवरायांनी 19 मे रोजी प्रतापगडच्या भवानी मातेचे दर्शन घेऊन केली. भवानी मातेला सव्वा मन सोन्याची छत्री अर्पण केली. राजाभिषेकाची गुप्तता पाळताना शिवरायांनी राजाभिषेक नेमका कोणाचा आहे स्वतःचा की कोणा दुसऱ्याचा ? याबद्दल जाणीवपूर्वक साशंकता ठेवली होती. निजामशाहीतील वंशातील एक राजा शिवरायांच्या ताब्यात आहे असा एक प्रवाद त्या काळात प्रचलित होता. राजाभिषेकाचा डाव यावनी सत्तेला हाणून पाडता येऊ नये म्हणून शिवरायांनी निजामशाही वंशातील कोणी जवळ बाळगल्याची योजना असावी.[१६] राजाभिषेकापूर्वी शिवरायांचा **व्रात्यस्तोमविधी** करण्यात आला. 29 मे 1674 रोजी तुलादान विधी करण्यात आला. उपनयन विधी व दोन तुला विधी पार पडल्यावर जेधे शकावलीप्रमाणे शिवरायांनी सममंत्र विवाह केला. त्यांना प्रायश्चित्य घेण्यास सांगून क्षत्रियत्व बहाल केले गेले. 6 जून 1674 रोजी पहाटे राजाभिषेकाची सुरुवात शिवरायांनी कुलदैवतांच्या पूजनाने केली. स्वस्तिक पूजन केले. अग्नी व ग्रहांची प्रतिष्ठापना केली. पवित्र जलस्नान केले. सुवासिनींनी पंचारतीने ओवाळले. वेदमंत्राच्या घोषात गागाभट्टाद्वारा शिवाजीराजे, संभाजीराजे व महाराणी सोयराबाई यांच्यावर अभिषेक करण्यात आला. शस्त्र पूजा करण्यात आली. सिंहासनारोहन वेदमंत्राच्या घोषात करण्यात आले. गागाभट्टाने शिवरायांच्या मस्तकावर वेदमंत्राच्या घोषात राजमुकुट ठेवला. तोफांचा कडकडाट करण्यात आला. हेन्री ऑक्झिंडेनने शिवरायांना नजराणा पेश केला. छत्रपतींनी राजमातेचे दर्शन घेतले. छत्रपतींनी गडावरील देवदेवतांचे दर्शन घेतले. शिवरायांनी **'सिंहासनाधीश्वर छत्रिय कुलावंतस महाराजाधिराज छत्रपती'** ही पदवी धारण केली. **"महते जान राज्यायैष वोस्ऽमाकं ब्राह्मणानां राजा''** असे म्हणत ब्रह्मवृंदांनी अभिसिंचन केले. **"कायद्यावर अधिष्ठित न्यायाने राज्य करेन."** असे देव गुरु व अग्नी या साक्ष ठेवून शिवरायांनी याप्रसंगी वचन दिले. जनतेस सुराज्याचे वचन दिले गेले. मुलकी व फौजदारी कायदे सर्वांना समानच लागू झाले. शिवरायांची दानपत्रे, वतनपत्रे, इनामपत्रे विश्वासास पात्र ठरली. करार मतदारांना बरोबरीचा व अधिकृत दर्जा प्राप्त झाला. **सभासद म्हणतात " हा मराठा पातशहा छत्रपती झाला, ही गोष्ट काही सामान्य झाली नाही".**मुस्लिम राज्यकर्त्यांना राज्य करण्यास ब्राह्मणी धर्माचा आक्षेप नव्हता परंतु शूद्रांना राजाभिषेक करण्यास विरोध होता, असे सभासद सूचित करतात.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

राजाभिषेकाने शिवाजी महाराज अधिकृत राजा झाले. ते छत्रपती झाले. राज्यकारभार करण्याचा त्यांना अधिकार मिळाला. राजाभिषेकाने त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. रयतेला राजा मिळाला. हजारो वर्षांची गुलामगिरी नष्ट झाली. राजकीय स्वातंत्र्याचा उद्घोष करण्यात आला. नाऊमेद झालेल्या प्रजेला राज्यकर्ता होण्याचा आत्मविश्वास राजाभिषेकाने मिळाला. राजाभिषेकाने शिवाजी महाराज **शककर्ते** झाले. सार्वभौम राजसत्तेचे निदर्शक असणारे **छत्र, चामर, मोर्चेल, सूर्यपान, अबदागीर व माही मरातब** इत्यादी राजचिन्हे शिवरायांनी धारण केली. सोन्याचे होन व तांब्याची शिवराई ही त्यांची चलन व्यवस्था होती. राजाभिषेकाने नवे युग, नवे चलन व स्वतंत्र ध्वज निर्माण झाले. आधुनिक लोकशाहीचा पाया या शिवराजाभिषेकाने घातला.

राजाभिषेकाने नवीन 'राजाभिषेक शक' कालगणना सुरू झाली.[१७] त्यांनी राज्यव्यवहार कोशाची निर्मिती केली. स्वराज्याच्या चलन व्यवस्थेसाठी टांकसाळ सुरू केली. स्वतःची अर्थव्यवस्था निर्माण केली. अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली. शिवरायांना राजमुकुट, छत्र-चामर धारण करण्याचा अधिकार मिळाला. त्यांना अधिकृतपणे व्यापार, तह, आंतरराष्ट्रीय करार करण्याचा अधिकार प्राप्त झाला. रयतेला आर्थिक, भाषिक, सांस्कृतिक स्वातंत्र्य मिळाले. राज्य सार्वभौम झाले. राजाभिषेकाने स्वराज्याला अधिष्ठान प्राप्त झाले. राजाभिषेकाने भारतीय स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली. पुढील काळात अनेक समाजसुधारक, क्रांतिकारक, देशभक्तांनी शिवरायांची प्रेरणा घेऊन देशात विविध क्षेत्रांत कार्य केले, ही राजाभिषेकाची फलश्रुती आहे. राजाने आपल्या रयतेला स्वराज्याची अमूल्य भेट अर्पण केली.

राजाभिषेकामागील ब्राह्मणी अर्थकारणाची विवेचन करताना **डॉ. आंबेडकर** म्हणतात, "सामाजिक दर्जा ठरविण्याच्या बाबतीत ब्राह्मण जे निर्णय देत असत ते कोणत्या पक्षाकडून किती पैसे मिळेल याकडे दृष्टी ठेवून ते कमी जास्त अनुकूल निर्णय देत असत". सभासदाने राजाभिषेक समारंभावर किती खर्च झाला याची आकडेवारी आपल्या बखरीमध्ये दिली आहे तो म्हणतो, "शिवाजीच्या राजाभिषेकाच्या समारंभाचा एकंदर खर्च 1 कोटी 42 लक्ष होन झाला होता. या समारंभाला 50000 वैदिक ब्राह्मण उपस्थित होते". हेन्री ऑक्झेण्डेन आपल्या रोजनिशीत लिहितो, शिवाजीचे सोन्याबरोबर वजन केले तेव्हा ते वजन 16000 होन झाले; ते 16000 होन व दुसरे 1000 होन यांची दक्षिणा ब्राह्मणांमध्ये वाटण्यात आली.[१८]

दुसरा शाक्तराजाभिषेक:

शिवरायांनी दुसरा राजाभिषेक शाक्त पद्धतीने केला. शाक्तपंथाचा स्वीकार केला. शाक्त हे धर्म जातीव्यवस्था व स्त्री दास्य नाकारतात. शाक्त वैदिकी परंपरा नाकारतात. शिवाजी राजे भवानी देवीचे उपासक होते. त्यांना तंत्र मार्ग संमत होता.[१९] वाघ्या-मुरळी व गोंधळाची परंपरा शिवरायांच्या भोसले घराण्यामध्ये होती. अश्विन शुद्ध पंचमी (ललित पंचमी) संवत 1596अश्विन शु. 5 म्हणजे दि 24 सप्टेंबर 1674 साली सामवेदातील मंत्राने निश्लपुरीने शिवरायांचा तांत्रिक राजाभिषेक केला.[२०] दुसऱ्या राजाभिषेकास निश्चलपुरी व 'शिवराजाभिषेककल्पतरू' हा ग्रंथ लिहिणारा गोविंद भट बर्वे कारणीभूत आहे असे **वा. स. बेंद्रे** लिहितात. दुसऱ्या राजाभिषेकाचे कारण वैदिक संस्कृती विरुद्ध तांत्रिक संस्कृती संघर्ष हे आहे. दुसऱ्या राजाभिषेकाचे कारण अपशकुन किंवा अंधश्रद्धा नव्हती तर शास्त्या ब्राह्मण, मराठा, कायस्थ यासारख्या जातींवर शासन करावयाचे होते. शेतकरी गण-कुळ प्रथाक बहुजन समाजावर राज्य करावयाचे होते. शिवाजी राजे शाक्त देवी उपासक असल्याने दुसरा राजाभिषेक महत्त्वाचा होता. दुसरा राजाभिषेक वैदिक धर्म व्यवस्थेला शह होता. वर्णवर्चस्ववादाला शह होता. शाक्त पद्धतीने राजाभिषेक करणारे भारतीय इतिहासातील शिवाजी राजे पहिले राज्यकर्ते होते.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

धर्ममार्तंड धर्मदंडापेक्षा राजदंड श्रेष्ठ मानत होते. राजकारणात धर्माची ढवळाढवळ त्यांना अमान्य होती. त्यांना सार्वभौमत्व, म्हणजे मनाप्रमाणे निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य हवं होतं. अशी व्यक्ती, वर्णवर्चस्ववादी अष्टप्रधान व धर्ममार्तंडांना राजा म्हणून मान्य होणं शक्यच नव्हतं. स्वराज्यसंकल्प तर पूर्ण झाला होता. पण स्वराज्यासाठीच्या समतावादी ध्येयधोरणांच्या अंमलबजावणीसाठी, राजा सार्वभौम असणं गरजेचं होतं. त्यासाठी राजाभिषेक अत्यावश्यक होता. म्हणून मानसिक, शारीरिक, आर्थिक तोशिस सहन करुन शिवरायांनी तांत्रिक राजाभिषेक करवून घेतला. सार्वभौमत्वाचा अधिकार, समाजातील सर्व अमंगळ भेदाभेद गाडणारा, सर्वोच्च समतावादी शाक्तधर्मच देवू शकत होता. त्यामुळेच विषमतावादी वैदिक धर्माचं जोखड झुगारुन, शिवरायांनी निश्चलपुरी गोसावी या शाक्तधर्माचार्या करवी दुसरा राजाभिषेक करवून घेतला व राजाच्या अधिकारातली धार्मिक लुडबूड बंद केली. शाक्त राजाभिषेकामुळे राजे खऱ्या अर्थाने सार्वभौम तर बनलेच, ते **बहुजन प्रतिपालक, कुळवाडीभूषण** छत्रपती शिवरायही झाले होते. शाक्त शिवराजाभिषेकाचं हे असं ऐतिहासिक वास्तव आणि महत्वपूर्ण योगदान आहे. **कॉम्रेड शरद पाटील** 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण? महम्मदी की ब्राह्मणी' या शोध ग्रंथात म्हणतात, दुसऱ्या राजाभिषेक आधारे शिवरायांनी शाक्तपंताची दीक्षा घेऊन अस्पृश्यतेला तडा देण्याचा प्रयत्न केला होता. शाक्त राजाभिषेक म्हणजे शिवरायांचा वर्ण जाती व्यवस्थेविरोधातील लढा होता. भाई माधवराव बागल म्हणतात, "छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हिंदू धर्माचे रक्षण करण्याकरता नव्हता, गो ब्राह्मणांचे प्रतिपालन करण्याकरता नव्हता, तो वर्ग संघर्ष होता. कष्टकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या विरुद्ध होता." ते पुढे लिहितात, "जात्योन्नतीसाठी शिवाजीला गागाभट्टाकडून ऐन्द्र्याभिषेक करुन घ्यावा लागला. पण हा ब्राह्मणीकरणाचा प्रवास होता. हा राजाभिषेक करुनही उच्चजातीय मंत्र्यांनी शूद्र प्रजेची लूट व छळ आणि शिवाजीची शूद्र म्हणून अवहेलना थांबवली नव्हती. शाक्त संभाजीचा यौवराज्यकाळापासून या मंत्र्यांशी प्रजेची बाजू घेऊन सुरु झालेला संघर्ष वाढल्यामुळे शिवाजीने शाक्त राजाभिषेकाचे पाऊल टाकले."

राजाभिषेकाचे समीक्षण:

एतद्देशीयांचे शोषणविरहित स्वराज्य स्थापन करण्याचे मातृप्रेरणेने प्रज्वलित केलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी व तीस वर्षे केलेल्या अहोरात्र प्रयत्नाचे सार्थक झाल्याची आत्मकृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि ती दृश्य स्वरूपात सर्वासमोर मांडण्यासाठी राजाभिषेक हाच एकमेव पर्याय असल्याने शिवाजी राजांनी स्वतःस राजाभिषेक केला. शिवाजी राजे छत्रपती झाले याचा आनंद प्रत्येक मावळ्याला, कुणब्याला, बलुतेदाराला, शूद्रातिशूद्राला आणि मुसलमानालाही झाला. त्यांना आपणच राजे झालो असा अत्यानंद झाला. समस्त रयतेला इतका आनंद, इतिहासात कधीही झाला नव्हता. स्वतंत्र सार्वभौम हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. जुलमी सत्तांना आव्हान मिळाले. कायदेशीर अडचणींचे निवारण होऊन न्यायाधीष्ठीत राजशक्तीची स्थापना झाली छत्रपतींनी 'राज्यव्यवहार कोश' हा ग्रंथ लिहून घेतला. प्रशासनाची घडी घालून दिली. जुन्या रितीरिवाजात दुरुस्त्या केल्या. यासाठी बाळाजी आवजी चिटणीस कडून 'लेखनप्रशस्ती' ग्रंथ लिहून घेऊन मुसलमानी लेखन पद्धतीला पायबंध घातला. शासन व्यवस्थेचे भारतीयकरण केले. सुराज्याची ग्वाही दिली.

राजाभिषेकानंतर चार दिवसाच्या आत शिवरायांनी आपले जाहीरनामे म्हणजे 'कानू जाबते' जाहीर केले. यामध्ये स्वराज्याची शासन पद्धती कशी असेल याची नियमावली होती अर्थात एक प्रकारची राज्यघटनाच होती. राज्यकारभाराचे सूक्ष्म नियम यामध्ये घालून दिले. त्यांनी आपल्या विश्वासातील माणसे जागोजागी स्वतंत्रपणे नेमली. राजाभिषेकानंतर प्रभावळचा सुभेदार जिवाजी विनायक

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

यास 18 जानेवारी 1675 रोजी शिवाजी राजे लिहितात, "ब्राह्मण आहे म्हणून कोण मुलाहिजा ठेवतो". राजाभिषेकानंतर राजसत्तेला मनुस्मृति विरुद्ध जाऊन ब्राह्मणालाही दंड देता येऊ लागला. राजाभिषेकानंतर दक्षिण दिग्विजय मोहिमेवेळी शिवरायांनी कुतुबशाहची गोवळकोंडा येथे भेट घेतली. एका मुस्लिम राजाने हिंदू पद्धतीने गुढ्या उभारून शिवरायांचे स्वागत केले होते. शिवरायांनी स्वतःचा राजाभिषेक केल्याने मुस्लिम राज्यकर्त्यांना त्यांना बरोबरीने वागवावे लागले. कर्नाटक स्वारीच्या वेळी मालोजी घोरपडे व व्यंकोजी राजे यांना पाठविलेल्या पत्रात, "मराठा तितुका मेळवावा व व महाराष्ट्र धर्म वाढवावा" अशी शिकवण शिवाजी राजे देतात. शिवाजीराजांवर राजाभिषेकाने आलेली हि जबाबदारी होती.[२१]

राजाभिषेकानंतर धर्म सत्तेला राजसत्तेने अंकित केले. वर्ण व जातीव्यवस्थेच्या भावनेला शह देणारी फर्माने शिवरायांनी काढली. मग्रूर सामंतांनाही आपल्या धाकात ठेवले. शिवराजाभिषेक म्हणजे मनुस्मृतीच्या विरोधातील एक मोठी क्रांती होती. राजाभिषेकानंतर शिवरायांनी काढलेले आज्ञापत्र म्हणजे लोकाभिमुख राज्यकारभाराची सनदच होती. राजाभिषेकाने धार्मिक मजुरी गाडली गेली. सरंजामी अत्याचार गाडला गेला. वतने इनामे खालसा झाली. ज्येष्ठ इतिहासकार **डॉ. जयसिंगराव पवार** यांनी आपल्या 'शिवछत्रपतींचा समाजक्रांतीचा एक महान प्रयत्न' या शोधनिबंधात या विषयावर विस्तृत प्रकाश टाकला आहे ते म्हणतात, "स्वराज्य म्हणजे परकीय सत्तेच्या राजकीय दास्यापासून मुक्तता एवढाच मर्यादित अर्थ शिवाजी महाराजांच्या स्वराज्यास प्राप्त होत नाही, तर परकीय सत्तेप्रमाणेच स्वकीय जुलमी लोकांपासूनही मुक्तता, हाही अर्थ स्वराज्यात अभिप्रेत होता!" शिवरायांनी समाजात पिढ्यानपिढ्या वर्चस्व गाजविणाऱ्या वतनदारांची वतने त्यांचे हक्क-लाजीमे व इनामांसह सरकार जमा केली आणि त्याच्या बदल्यात त्यांना रोख नेमणुका करून दिल्या.[२२]

परमानंदांच्या अनुपुराणावर भाष्य करताना **वा.सी. बेंद्रे** लिहितात, "इतर जातींना कडक शासन मिळत असे. श्रेष्ठांना शासन करण्यास उपाय नव्हता. छत्रसिंहासनाची प्रतिष्ठा करून शिवाजी संभाजने जातीने चौकशी करून कडक शासन करण्यास मागेपुढे पाहिले नाही. राजाभिषेक होताच अगदी पंधरा दिवसात शिवाजी राजांनी जाती-धर्माच्या व्यवस्थेबद्दल आज्ञापत्रे आपल्या स्वतःच्या नावाने काढली आहेत." शिवरायांच्या अज्ञापत्रांना वैचारिक बैठक होती. त्यामध्ये गोरगरीब रयते विषयी कळवळा होता. शिवरायांनी स्वराज्याची उभारी निव्वळ दगड मातीच्या किल्ल्यांनी केली नसून रक्त हाडा माणसाच्या 18 पगड जातीच्या मावळ्यांना सोबत घेऊन केली होती.

शिवाजी राजे समतावादी, महिलांचा आदर करणारे, वंचित उपेक्षितांचे हितकर्ते व वर्ण-सरंजाम व्यवस्थेच्या विरोधात होते. *रयतेच्या भाजीच्या देठाला हात लावू नये वाळलेले झाड लाकूड शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय घेऊ नये.* ही सक्त ताकीद आपल्या शिपायांना शिवरायांची होती. राजाभिषेक म्हणजे जुलमी अन्यायी भ्रष्ट स्वकीय व परकीय सत्तांच्या शोषणकारी व्यवस्थेविरुद्ध न्याय देण्याची व सुराज्याची ग्वाही होती. राजाभिषेकांमुळे स्वराज्यास नैतिक कायदेशीर मूल्याधिष्ठित सार्वभौमत्व मिळाले. त्यामुळे पुढे छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई हे मुघलांविरुद्ध यशस्वी संघर्ष करू शकले.

रा. वि. ओतुरकर म्हणतात, "शिवराजाभिषेक म्हणजे आग्रा भेटीनंतर त्यांचा राजा हा किताब धुडकावून स्वतःचे सार्वभौमत्व जाहीर करून त्यांनी मांडलिकत्व झुगारल्याचे ध्योतक होते". राजाभिषेकानंतर राजपत्रावर **'क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शिवछत्रपती'** असा निर्देश होऊ लागला. नवी कालगणना सार्वभौमत्वाचे प्रतीक असते. नवे चलन तांब्याची शिवराई, सोन्याचा शिवराई होन व त्यावर 'श्री राजा शिवछत्रपती' अक्षरे कोरविली. शिवाजी हा प्रजेचा कल्याण कर्ता राजा होता. जनतेच्या स्वातंत्र्याचा

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

पुरस्कार होता. शिवरायांनी धार्मिक आक्रमणाला सर्वधर्मसमभावाने उत्तर दिले. त्यामुळेच ते यशस्वी झाले. शिवरायांचा राजाभिषेक म्हणजे सर्व प्रकारच्या गुलामगिरी आणि मानभंगाच्या समाप्तीची घोषणा होती. राजाभिषेकाने शिवरायांच्या हाती धार्मिक, राजकीय व सामाजिक सत्ता हाती आली.

शिवाजी राजांनी धार्मिक राजवटीची निर्मिती व्हावी यासाठी लढा दिलेला नव्हता. भारत माझा देश आहे जशी आज सर्व भारतीयांची भूमिका आहे तसेच हे स्वराज्य माझे आहेत ही उत्कट स्वराज्यनिष्ठा तत्कालीन वंचित उपेक्षित सर्वहरा भूमिपुत्रांच्यामध्ये शिवरायांनी चेतविली. शिवरायांचे स्वराज्य हे एक आव्हान होते. जसे ते मुघलांना होते, तसेच सरंजामी जुलमी मग्रूर वतनदारांना सुद्धा होते. औरंगजेबाच्या हुकूमशाही विरोधात शिवरायांनी समताधिष्ठित मानवतावादी स्वराज्य निर्माण केले. हे स्वराज्य आपल्या मुक्तीसाठी आहे हे ओळखून शतकानुशतके तुडवले गेलेल्या, दडपल्या गेलेल्या इथल्या मातीतल्या भूमिपुत्र-मावळ्यांनी स्वराज्यासाठी बलिदान दिले. शिवरायांनी राजाभिषेकाद्वारे इथली जनता सुरक्षित आहे, त्यांची जिवीत सुरक्षित आहे, अब्रू सुरक्षित आहे, त्यांचे वित्त सुरक्षित आहे ही भावना निर्माण केली. शासन करतेवेळी न्याय करताना व्यक्ती ब्राह्मण असो महार असो व मराठा असो त्याला सारखाच न्याय द्यायचा या मताचे राजे होते. **कोस्मे-द-ग्वार्दने** शिवचरित्रात लिहितो, "शिवाजी सर्वांना एकाच न्यायाने वागवितो."

"शिवाजी म्हणजे युद्ध नव्हे तर नव्या व्यवस्थेचा आग्रह" अशी मांडणी **नरहर कुरुंदकर** यांनी केली आहे. अफजलखानाचा वध किंवा शाहिस्तेखानाची बोटी छाटणे यापेक्षाही इथल्या जुलमी वतनदारांचा वध हे जास्त रोमांचकारी व क्रांतिकारी आहे. **नरहर कुरुंदकर** म्हणतात[२३], "शिवाजीचा राजाभिषेक हे सर्व भारतभर पसरलेल्या प्रजेला आपण तुमचे मुक्तिदाते आहो, नेते आहो आणि रक्षणकर्ते आहो असे आश्वासन होते! महाराजांच्या राजाभिषेकाने शिवाजी हे आव्हान औरंगजेबाच्या थेट राजधानीत येऊन उभे राहिले."राजाभिषेकांमुळे शिवरायांच्या पश्चात एक नवी राज्यव्यवस्था उभी राहिली. एक नवा प्रकाश, एक नवी क्रांती उभी राहिली. जी पुढे मुघलांना पुरून उरली. शिवरायांचे स्वराज्याचे युद्ध हे जनतेचे स्वातंत्र्य युद्ध होते.

पुढीलकालात स्वराज्य रक्षक शंभू महाराजांचे स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान होते. शंभूराजांच्या बलिदानानंतर इथले स्वराजद्रोही सरदार, वतनदार व जहागीरदार वतनाच्या आमिषापोटी पटापट मुघलांच्या गोठात जाऊन गुलाम झाले. त्यांना देश स्वतंत्र राहिला काय? गुलाम झाला काय? यात फारसा रस नव्हता. अशावेळी स्वराज्याच्या रक्षणाचे कार्य इथल्या सर्वसामान्य गरीब मावळ्यांनी हाती घेतले.

संशोधन निष्कर्ष:

मध्ययुगीन मनुस्मृतीच्या चौकटीनुसार शूद्रांना राजा होण्याचा अधिकार नाकारला जात होता. परकीय आदिलशाही व मुघलांची चाकरी करणाऱ्या सरदारांना क्षत्रियत्वाचे गुणवत्ता निकष विचारले जात नसत; परंतु स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापणाऱ्या शिवरायांच्या राजाभिषेकाला स्थानिक ब्रह्मवृंदाकडून विरोध झाला. यावर मात करण्यासाठी गागाभट्टांच्या साहाय्याने 'श्रीशिवराजाभिषेक प्रयोग' हा ग्रंथ सिद्ध करून वैदिक राजाभिषेक घडवून आणला गेला. ही घटना वर्णव्यवस्थेच्या वर्चस्वाला दिलेले मोठे आव्हान होते. शिवराजाभिषेक ही केवळ १७ व्या शतकातील राजकीय सत्ता बदलाची घटना नव्हती, तर ती शतकानुशतके दडपलेल्या भूमीपुत्रांना आत्मभान, स्वाभिमान आणि मानवी हक्क मिळवून देणारी सामाजिक व राजकीय क्रांती होती. औरंगजेब सत्तावीस वर्षे महाराष्ट्रात लढूनही स्वराज्य जिंकू शकला नाही, कारण शिवरायांनी राजाभिषेकाद्वारे रयतेच्या मनात 'आपले राज्य' ही भावना दृढ केली होती. शिवराजाभिषेकाने आधुनिक

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

लोकशाही, सर्वधर्मसमभाव, स्त्री-सन्मान, शेतकरीहित आणि कायद्याचे राज्य या मूल्यांची मुहूर्तमेढ रोवली. म्हणून शिवराजाभिषेक दिन हा केवळ इतिहास नसून तो भारतीय लोकशाहीचा आणि बहुजन मुक्तीचा लोकोत्सव आहे. शिवरायांचे स्वराज्य त्या काळातील आंतरराज्य राजकारणात कोणत्याही असहिष्णुतेचा निषेध करण्याचे एक साधन बनले. इस्लामी सत्तेमधील बंडखोरांचे एक आश्रयस्थान बनले. हे इतिहासातील पुढील घटनाक्रमावरून लक्षात येते.

समारोप:

औरंगजेब सत्तावीस वर्षे महाराष्ट्रात थांबला. तो लढला, त्याने अनेक किल्ले जिंकले; परंतु त्याला शिवरायांनी निर्माण केलेले स्वराज्य आणि येथील मावळे कधी जिंकता आले नाहीत, कारण शिवरायांनी राजाभिषेकाच्या माध्यमातून निर्माण केलेला स्वाभिमान! आपले राज्य हेच स्वराज्य ही भावना रयतेत दृढ झाली होती. राज्याभिषकाने रयतेत चैतन्य निर्माण झाले. शेकडो वर्षांची गुलामगिरी नष्ट झाली. हतबल, निराश झालेल्या जनतेच्या मनात धैर्य, शौर्य, आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम राजाभिषेकाने झाले होते म्हणून ते औरंगजेबाला गाडल्या शिवाय राहणार नव्हते. हिच शिव राजाभिषेकाची फलश्रुती होती.

शिवरायांचा राजाभिषेक दिन म्हणजे बहुजनांसाठी मुक्ती दिन आहे. तो राजाभिषेक दिन लोकोत्सव झाला पाहिजे. तो आनंदाने साजरा करूया. **महाकवी वामनदादा कर्डकांनी** अतिशय सुंदर शब्दात शिवरायांची महती गायली आहे.

शिवरायांच्या छायेखाली कधीच नव्हती वाण..!
आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान ..!!
असाच माझा शिवबा होता माणुसकीची खाण,
आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान....!!!

संदर्भ:

१. पहिला शिवराजाभिषेक करणारा गागाभट्टाने 'श्रीशिवराजाभिषेक प्रयोग' व दुसऱ्या तांत्रिक राजाभिषेकासाठी गोविंद भट बर्वे याने 'शिवराजाभिषेककल्पतरू' हे ग्रंथ लिहिले; त्यामध्ये राज्याभिषेक असा शब्दप्रयोग नसून राजाभिषेक असा शब्दप्रयोग आहे, म्हणून संशोधकाने राजाभिषेक हा शब्द शोधले निबंधात वापरला आहे.अभिषेक राजाचा होतो राज्याचा म्हणजे राजसत्तेचा नाही.
२. शिखरे चंद्रशेखर, प्रति इतिहास शिव इतिहासाचे सत्य स्वरूप, जिजाई प्रका पुणे, पाचवी आवृत्ती 2011, पान नं 113.
३. पानसरे गोविंद शिवाजी कोण होता ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन कोल्हापूर आवृत्ती तिसरी,प्रकाशन वर्ष11 एप्रिल 1988 पान नंबर 38 व 39.
४. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, ब्राह्मणी परंपरा आणि छत्रपती शिवाजी महाराज, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2002, पान नंबर 17.
५. राणा अशोक राजाभिषेक पहिला व दुसरा जिजाई प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती 2007 पान नंबर ६.
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्हिन्सेट स्मिथ यांचा संदर्भ देताना शूद्र पूर्वी कोण होते या ग्रंथात म्हटले आहे, "रजपूत हे हुण होते त्यांना बौद्धांच्या विरुद्ध प्रतिक्रांती करण्यासाठी ब्राह्मणांनी क्षत्रियाचा दर्जा दिला होता."
७. राणा अशोक राजाभिषेक पहिला व दुसरा जिजाई प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती 2007 पान नंबर ९.
८. डॉ. आंबेडकर भीमराव रामजी, उपरोक्त,पान नं. 14.
९. डॉक्टर आंबेडकर कित्ता,पान नंबर 17.
१०. साळुंखे नीरज, दैत्यबळी कुंतलदेश महाराष्ट्र,लोकायत प्रकाशन सातारा,तिसरी आवृत्ती २०१७, पान नं. 106.

११. राणा अशोक, वर्णवर्चस्वाच्या विरोधात शिवरायांचा संघर्ष, जिजाई प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००९,पान नंबर 24.
१२. पानसरे गोविंद, शिवाजी कोण होता ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन कोल्हापूर आवृत्ती तिसरी,प्रकाशन वर्ष11 एप्रिल 1988 पान नंबर 46.
१३. मोरोपंत पिंगळे राजा व्हायला तयार होते अशी माहिती डॉ. आंबेडकरांनी दिली आहे. बाळाजी आवाजीचा राजाभिषेक करू असाही एक पर्याय सुचवण्यात आला होता. अशोक राणा म्हणतात, "कायस्थ बाळाजी आवजी राजा होणे ब्राह्मण मोरोपंत पिंगळेला मान्य नव्हते म्हणून त्याने शिवराजाभिषेकाला मान्यता दिली."
१४. ओतुरकर रा. वि.,शिवराजाभिषेक लेख,मराठ्यांचा इतिहास, खंड पाहिला महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 1984 पान नंबर 233.
१५. ओतुरकर रा. वि., उपरोक्त,पान नंबर 246.
१६. ओतुरकर रा. वि., कित्ता,पान नंबर 233.
१७. डॉ. आंबेडकर भी. रा., छत्रपती शिवाजी विरुद्ध ब्राह्मण, नाग नालंदा प्रका. इस्लामपूर, पुनर्मुद्रण 2023 पान नं 18.
१८. ठाकरे प्रबोधनकार, शिवरायांवरील इतर लेख आणि दगलबाज शिवाजी, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, पुनर्मुद्रण 2013 पान नंबर 48 ते 50.
१९. डॉ. साळुंखे आ.ह. छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा राजाभिषेक, लोकायत प्रका. सातारा, प्रथम आवृत 2015, पान नं 48.
२०. ओतुरकर रा. वि कित्ता,पान नंबर 233.
२१. परकीयांच्या दृष्टीतून शिवाजी, रा. व्य. केतकर, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती मे 1987, पान नं 60.
२२. राणा अशोक, उपरोक्त,पान नं. 28 व 29.
२३. कुरुंदकर नरहर, छत्रपती शिवाजी महाराज जीवन रहस्य, इंद्रायणी प्रकाशन पुणे, प्रथम वृत्ती 2003, पान नं. ४९.